**राज्यात दत्तक प्रक्रिया अधिक गतिमान आणि पारदर्शक होणार** >>पान 2

**'गुंगी गुडिया' पोस्टवरून काँग्रेस विरोधात संताप; पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, इंदिराजींप्रमाणे सुनेत्रा पवार...** >>पान 3

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'सक्षम कौशल्य जनगणना' कॉफी टेबल बुकचे प्रकाशन** >>पान 4



# दैनिक आपला विदर्भ




**अभिनेत्री मृणाल ठाकूर करणार AI-निर्मित डीपफेक मजकुराबाबत कडक कायदेशीर कारवाई...**

आतील पान

सुविचार

हार पत्करू नका, ती तुमचं भविष्य ठरवत नाही.


apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 21 ■ बुधवार, दि. 05 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



# महाराष्ट्रातील राजकीय-शैक्षणिक बदलाचा शिल्पकार हरपला, डॉ.डी. वाय. पाटील यांचे निधन

**दैनिक आपला विदर्भ**

**कोल्हापूर । प्रतिनिधी :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यपाल डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील उर्फ डॉ. डी. वाय. पाटील यांचे आज कोल्हापूरमध्ये निधन झाले.ते ९० वर्षांचे होते. मागील काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती बरी नव्हती. डी. वाय. पाटील यांनी म हाराष्ट्रात व इतरत्र अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना करत शिक्षणाची ज्ञानगंगा अनेक विद्यार्थ्यांसाठी खुली केली. राजकीय-सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना पद्मश्री या नागरी पुरस्काराने सन्मानित केले.

डॉ. डी. वाय. पाटील यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी बुधवारी, ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत कसबा बावडा येथील यशवंत निवास या ठिकाणी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर अंत्ययात्रा सुरू होणार आहे. कसबा बावडा येथील डी. वाय.पाटील मेडिकल कॉलेजच्या प्रांगणात अंत्यसंस्कार केले जाणार असल्याची माहिती आहे.

डी.वाय. पाटील १९५७ ते १९६२ दरम्यान कोल्हापूर शहराचे महापौर हो-ते. १९६७ व १९७२ साली ते पन्ह-ळा विधानसभा मतदारसंघामधून विधानसभेवर निवडून आले होते. डी. वाय. पाटील यांनी संस्था उभारणीतून नागरीक घडतात, समाजाची उभारणी होते, या धोरणातून राज्यात शैक्षणिक संस्थांचा विस्तार केला.



२२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील 'अंबाप' या छोट्याशा शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डॉ. डी. वाय. पाटील यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले. आपल्या प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर त्यांनी त्रिपुरा आणि बिहारचे राज्यपाल म्हणून यशस्वी कार्यभार सांभाळला; तसेच पश्चिम बंगालच्या राज्यपालपदाची अतिरिक्त धुराही लीलया पेलली. राज्यपाल पदाच्या कार्यकाळात त्यांनी शिक्षण, प्रशासन आणि सामाजिक उपक्रमांना नेहमीच प्राधान्य दिले.

डॉ. डी. वाय. पाटील यांनी १९८३ मध्ये नवी मुंबई येथे रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या पहिल्या इंजिनिअरिंग कॉलेजची स्थापना केली. आज त्यांच्या 'डी. वाय. पाटील ग्रुप' अंतर्गत ७ पेखा जास्त अभिमतखाजगी विद्यापीठे आणि १५० पेक्षा अधिक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत.

आज या ग्रुपअंतर्गत कोल्हापूर, मुंबई आणि पुणे यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये ३ हून अधिक डीम्ड युनिव्हर्सिटीज, ६ खाजगी विद्यापीठे आणि १८० हून अधिक शिक्षण संस्थांचे जाळे पसरलेले आहे. अभियांत्रिकी (एहुग्हीग्हु), वैद्यकीय (शृग्म्र), फार्मसी, व्यवस्थापन, आर्किटेक्चर आणि कृषी अशा विविध क्षेत्रांत या संस्थांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

१९७८ च्या निवडणुकीत डी. वाय. पाटील यांचा पराभव झाला. त्यानंतरच्या पुढच्या पराभवानंतर त्यांचा राजकारणातील रस कमी झाला. राजकीयदृष्ट्या ऐन उम `दीच्या काळात डी. वाय. पाटील यांनी वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी राजकारणाचा त्याग केला. मात्र, त्यांनी राजकारणाच्या परिघाबाहेर आपली नवी इनिंग सुरू केली. डॉ. डी. वाय. पाटील यांनी शैक्षणिक संस्था स्थापन करून मध्यमवर्गीय, बहुजन विद्यार्थ्यांसाठीची ज्ञानगंगा खुली केली.

शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात उत्तुंग कार्य उभारणारे डॉ. डी. वाय. पाटील यांच्या पश्चात त्यांचा हा वारसा त्यांची मुले आणि नातू पुढे चालवत आहेत. त्यांचे सुपुत्र डॉ. संजय डी. वाय. पाटील, माजी पालकमंत्री सतेज उर्फ बंटी डी. वाय. पाटील, विजय डी. पाटील, डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील तसेच कन्या प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. नंदिता पालशेतकर हे सर्वजण शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रात सक्रिय आहेत. तर त्यांचे नातू, माजी आमदार ऋतुराज पाटील हेदेखील सार्वजनिक आणि राजकीय जीवनात कार्यरत आहेत.

## विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रमात बदल, अंतिम मतदारयादी आता २७ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमाच्या वेळापत्रकात सुधारणा केली आहे. सुधारित कार्यक्रमानुसार बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांच्यामार्फत घरोघरी भेटीचा कार्यक्रम ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण व पुनर्रचना १७ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण करण्यात येईल.

मतदारयादीचा प्रारूप मसुदा २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी आणि निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडेल. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदारयादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल, असे भारत निवडणूक आयोगामार्फत कळविण्यात आले आहे.

## पु. ल. कट्ट्यावर ७ ऑगस्टला विजयाबाईंच्या आठवणींचा जागर

**मुंबई। प्रतिनिधी :** ज्येष्ठ दिग्दर्शिका, नाट्यगुरू विजया मेहता यांच्या आठवणींचा जागर शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ रोजी सायं. ६:३० वाजता पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या पु.ल. कट्ट्यावर करण्यात येणार आहे. विजया बाईंनी लिहिलेल्या काही आठवणी, त्यांच्याविषयीच्या दिग्गजांच्या मुलाखती, लेख यांचे अभिवाचन शुभांगी भुजबळ, अक्षय शिंपी, पल्लवी वाघ-केळकर सादर करणार आहेत. कार्यक्रमात ज्येष्ठ रंगकर्मी प्रतिमा कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती लाभणार असून त्याही यावेळी विजया बाईंच्या आठवणींना उजाळा देणार आहेत.

अकादमीच्या चौथ्या मजल्यावरील बहुविध दालन येथे आयोजित या कार्यक्रमाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अकादमीकडून करण्यात येत आहे.





## राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची डॉ. डी. वाय. पाटील यांना श्रद्धांजली

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्रिपुराचे माजी राज्यपाल शिक्षण महर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. डॉ. डी. वाय. पाटील हे त्रिपुराचे राज्यपाल असताना त्यांच्याशी घनिष्ट परिचय झाला. त्रिपुरा तसेच बिहार येथे राज्यपाल पदावर कार्य करीत असताना आपले विनम्र आचरण व सौजन्यशील स्वभावामुळे त्यांनी राज्यपाल पदाची प्रतिष्ठा वाढवली. डॉ. डी. वाय. पाटील हे द्रष्टे शिक्षण तज्ज्ञ होते.

**उत्तर पूर्व राज्यातील गरजू होतकरू विद्यार्थ्यांना डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षण प्रवाहात आणले**

उत्तर - पूर्व राज्यातील अनेक गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी शिक्षण प्रवाहात आणले. डॉ. पाटील यांनी महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागात उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्था उभारल्या. गेल्या तीन दशकांमध्ये या संस्थांनी लाखो विद्यार्थी घडवले असून आज ते विविध क्षेत्रात योगदान देत आहेत. समाजकारण, राजकारण व शिक्षण क्षेत्रातील डॉ.पाटील यांचे कार्य भावी पिढ्यांना मार्गदर्शक राहील. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व त्यांच्या कुटुंबियांना आपल्या शोक संवेदना कळवतो, असे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## दूरदृष्टी असलेले शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांना मंत्री प्रताप सरनाईक यांची भावपूर्ण श्रद्धांजली

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवक आणि माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी तीव्र दु:ख व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या शोकसंदेशात मंत्री सरनाईक म्हणाले की, डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात केलेले कार्य अतुलनीय आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे लाखो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. समाजहिताची जाणीव ठेवून उभारलेला त्यांचा शैक्षणिक आणि सामाजिक वारसा भावी पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक दूरदृष्टीचा शिक्षणमहर्षी, समाजाभिमुख विचारवंत आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व गमावले आहे. ईश्र्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती देवो, अशा शब्दांत मंत्री सरनाईक यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.



# महाराष्ट्राने दूरदृष्टीचा शिक्षणमहर्षी गमावला

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :**डॉ. डी. वाय. पाटील हे केवळ शिक्षणसंस्था उभारणारे प्रशासक नव्हते, तर समाजपरिवर्तनाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून शिक्षणाला नवे क्षितिज देणारे दूरदृष्टीचे शिक्षणमहर्षी होते, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, त्यांनी उभी केलेली शैक्षणिक चळवळ लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी ठरली. आज डी. वाय. पाटील विद्यापीठातून विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून देश-विदेशातील हजारो विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळत आहे. देशभरात सात

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची डॉ. डी. वाय. पाटील यांना श्रद्धांजली**

स्वतंत्र विद्यापीठांची निर्मिती हा त्यांच्या दूरदृष्टीचा आणि कार्यक्षम नेतृत्वाचा ऐतिहासिक ठेवा असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले.

कोल्हापूर, पुणे आणि नवी मुंबई येथे उभारलेल्या अत्याधुनिक रुग्णालयांमुळे लाखो नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध झाली. तर नवी मुंबईतील जागतिक दर्जाचे डी. वाय. पाटील स्टेडियम उभारून त्यांनी क्रीडा क्षेत्रालाही नवी ओळख मिळवून दिली. शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा या तिन्ही क्षेत्रांचा समतोल विकास घडवून आणणारे ते एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले.

बिहार, त्रिपुरा आणि पश्र्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून त्यांनी घटनात्मक पदाची प्रतिष्ठा वाढवली. सार्वजनिक जीवनात शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला, असे गौरवोद्गारही शिंदे यांनी काढले.


डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक दूरदृष्टीचा शिक्षणमहर्षी, समाजाभिमुख विचारवंत आणि लाखो विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक गमावला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# समाजकारण-राजकारणाचा कार्यतपस्वी आधारवड हरपला

## शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** शिक्षण, सहकार क्षेत्रातील कार्याने समाजकारण, राजकारणात भरीव योगदान देणारे आणि या क्षेत्रातील अनेक संस्थांचे आधारवड ठरलेले कार्यतपस्वी नेतृत्व पद्मश्री डॉ. डी. वाय पाटील यांच्या निधनाने काळाने हिरावून नेले आहे, अशी शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहार, पश्र्चिम बंगाल, त्रिपुराचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. डॉ. पाटील यांच्या निधनामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नमूद केले आहे.



शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ. पाटील यांनी ज्ञानदेव या आपल्या नावाप्रमाणेच ज्ञानाची आराधना केली. शिक्षण क्षेत्रालाच आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. एका छोट्याशा शाळेपासून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास थक्क करणारा आहे. सुमारे दोनशे संस्था, विविध प्रकारची आठ विद्यापीठे आणि हजारो विद्यार्थी, असा त्यांच्या कार्याचा विस्तार झाला. विशेषत: वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, आर्किटेक्चर अशा वैविध्यपूर्ण अभ्यासक्रमांची महाविद्यालये आणि आधुनिक सुविधांच्या उभारणीतून त्यांनी आपल्या शैक्षणिक समुहासोबतच महाराष्ट्राचा नावलौकिक उंचावला. या महाविद्यालयांच्या माध्यमातून वैद्यकीय सोयी सुविधा आणि आरोग्य सेवेचे जाळे विस्तारले. राजकारणातही त्यांनी काम केले. ते दोनदा विधानसभा सदस्य होते. पण डॉ. पाटील रमले शिक्षण, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात. यातून त्यांनी अनेक भव्य दिव्य अशी शैक्षणिक संकुले, डॉ डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय स्टेडियमसारखे प्रकल्पही साकारले. डॉ. पाटील हे सहकार, शिक्षण, सांस्कृतिक - साहित्यिक आणि सामाजिक चळवळीचे आधारवड होते. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, सेवा आणि विनम्रतेची मूल्ये जपली. 'अहंकार म्हणजे जीवनाचा मृत्यू; तर अहंकाराचा मृत्यू म्हणजेच खरे जीवन' हा त्यांचा विचार त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचे प्रतिबिंब होता. आज त्यांचे पार्थिव अस्तित्व आपल्यात नसले, तरी त्यांनी रुजवलेली शिक्षणसेवेची परंपरा, विनम्रतेचा आदर्श आणि समाजहिताची मूल्ये कायम प्रेरणादायी राहतील. त्यांच्या जाण्याने एका दूरदर्शी शिक्षणमहर्षीचा अंत झाला असला, तरी त्यांचे विचार आणि कार्य पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहतील. डॉ डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे त्यांच्याशी निगडित अनेक समुह, संस्थांवर शोकमग्न झाल्या आहेत. डॉ. पाटील यांच्या परिवारावर दु:खाचा आघात झाला आहे, या सर्वांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. या सर्वांना हे दु:ख सहन करण्याची ताकद मिळावी, अशी ईश्र्वरचरणी प्रार्थना करतो, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' माहिती पुस्तिकेचे प्रकाशन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' या ऐतिहासिक कायद्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे आज प्रकाशन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मंत्रिमंडळातील सदस्य, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह उपस्थित होते.

महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र, कायदेशीर आणि सन्मानाची ओळख देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने हा महत्वपूर्ण कायदा लागू केला आहे. या कायद्याच्या तरतुदी सर्वसामान्य नागरिक, महिला शेतकरी; तसेच संबंधित यंत्रणांना सहज समजाव्यात, यासाठी ही माहिती पुस्तिका तयार करण्यात आली असून तिचे प्रकाशन करण्यात आले. 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' हा कायदा विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ७ जुलै २०२६ रोजी एकमताने संमत झाला असून राज्यपालांच्या मान्यतेनंतर २२ जुलै २०२६ रोजी राजपत्रात अधिकृतरित्या प्रसिद्ध करण्यात आला आहे.

या कायद्यामुळे शेती किंवा शेतीपूरक व्यवसायात प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिलांना, त्यांच्या नावावर जमीन असो वा नसो, 'महिला शेतकरी' म्हणून स्वतंत्र कायदेशीर ओळख मिळणार आहे. तसेच या कायद्यांतर्गत ग्रामसभा किंवा नगरपंचायतीच्या पडताळणीनंतर महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यात येणार असून, त्याच्या आधारे आर्थिक मदत,



अनुदाने, बियाणे, खते, बँक कर्ज, पीक विमा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ थेट मिळणे सुलभ होणार आहे. महाराष्ट्र हा महिला शेतकरी व शेतमजूर महिलांच्या सक्षमीकरणासाठी असा स्वतंत्र कायदा करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे.या सर्व विधेयकाची माहिती या पुस्तकात आहे.

## रोजगाराभिमुख शिक्षणाचे प्रणेते

कौशल्य शिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण ग्रामीण भागात पोहोचविण्याचे कार्य डॉ. डी. वाय. पाटील यांनी केले. तेच खऱ्याअर्थाने रोजगाराभिमुख शिक्षणाचे प्रणेते आहेत.डॉ. डी. वाय. पाटील यांचे भारतातल्या आणि महाराष्ट्रातल्या उच्च शिक्षणाला सकारात्मक दिशा देण्यामध्ये मोठे योगदान राहिले आहे. विशेषकरून उच्च शिक्षणाचे जाळे ग्रामीण भागात पोहोचविण्याचे मुख्य कार्य त्यांनी केले आहे; परंतु उच्च शिक्षण केवळ ग्रामीण भागात पोहोचविणे हा त्यांचा उद्देश नव्हता, तर त्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती कशी होईल, याकडे त्यांनी प्रामुख्याने लक्ष दिले होते. त्यांनी पारंपरिक शिक्षणापेक्षा नेहमी व्यावसायिक शिक्षणाकडे लक्ष केंद्रित केले. यातूनच किमान कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये कशा पद्धतीने निर्माण होतील आणि त्यातून त्यांना रोजगार कसा मिळेल, यावर त्यांचा भर असल्यामुळे त्यांनी जे अभ्यासक्रम राज्यात सुरू केले ते सर्व अभ्यासक्रम व्यावसायिक स्वरूपाचे होते. त्यातूनच त्यांनी कृषी, आरोग्य, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी अशा व्ययसायाभिमुख अभ्यासक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिकवून त्यांच्या रोजगाराभिमुखतेला चालना देण्याचे कार्य त्यांनी केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे आता सुरू झाले; परंतु डॉ. डी. वाय. पाटील यांच्या कार्यकाळात जुनी शिक्षण प्रणाली होती. त्यामुळे त्या काळात केवळ पारंपरिक शिक्षणावर भर दिला जात होता. कौशल्य शिक्षण या संकल्पनाच त्याकाळात नावारूपाला आली नव्हती. अशा काळातदेखील त्यांनी व्यावसायिक आणि कौशल्य शिक्षणावर भर दिला, हेच त्यांचे प्रमुख कार्य म्हणता येईल. यातूनच त्यांचा शिक्षणातील दूरदृष्टिकोन आपल्याला दिसून येतो. सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्था राबविली जात असताना खासगी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातूनदेखील शिक्षण व्यवस्थेत योगदान दिले जाऊ शकते. यासाठी त्यांनी डॉ. डी. वाय. पाटील खासगी विद्यापीठाची सुरुवात करून त्याचा राज्यभर विस्तार केला. त्या माध्यमातून आज लाखो विद्यार्थी कौशल्य शिक्षण घेत असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी शिक्षण व्यवस्थेची सुरुवातच मुळात व्यावसायिक आणि कौशल्य शिक्षणाने केली. त्यांचा भर कधीही पारंपरिक शिक्षणावर राहिला नाही. त्यामुळे पारंपरिक शिक्षणाला एका ठरावीक चौकटीतून बाहेर काढण्याचे मुख्य कार्य त्यांनी केले. सरकारी विद्यापीठांच्या जोडीलाच खासगी विद्यापीठांनी हातात हात घालून काम करत शिक्षण ग्रामीण भागापर्यंत तसेच तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे आणखी एक विशेष म्हणजे, स्थानिक गरजांना अनुसरून त्यांनी अभ्यासक्रमांची निर्मिती केली. यामध्ये देशासह राज्यातील कृषी, आरोग्य, उत्पादन, सेवा क्षेत्रातील गरजांचा विचार केला आणि त्यानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन कौशल्याधिष्ठित मनुष्यबळ निर्मिती करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांनी पंधरा ते वीस वर्षांपूर्वी ज्या कौशल्य शिक्षणाचा आणि रोजगाराभिमुखतेचा विचार केला, त्याच शिक्षणाचा समावेश आता सध्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आला आहे. विकसित भारताचे ध्येय आपल्याला गाठायचे आहे. त्यासाठी आपल्याला उत्पादन निर्मितीचे हब होणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्या उत्पादन क्षमतेत प्रचंड वाढ करावी लागणार आहे. ही वाढ करण्यासाठी कौशल्याधिष्ठित मनुष्यबळाची आपल्याला गरज आहे. हेच मनुष्यबळ तयार करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची निर्मिती करण्यात आली; परंतु हेच डॉ. डी. वाय. पाटील यांनी वीस वर्षांपूर्वी ओळखून शैक्षणिक कार्य केले, हाच त्यांचा उच्च शिक्षणातील द्रष्टेपणा होता, असे आपल्याला म्हणता येईल. येत्या २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न आपण पाहत आहोत. हे स्वप्न पाहत असताना या देशाला उत्पादननिर्मितीचे केंद्र तयार करावे लागणार आहे. त्यासाठी कौशल्याभिमुख शिक्षणाची गरज ओळखून संपूर्ण राज्यात केवळ उच्च शिक्षणावर भर न देता कौशल्याभिमुख शिक्षणावर भर देण्याची गरज डॉ. डी. वाय. पाटील यांनी ओळखून शिक्षण क्षेत्रात कार्य केले. त्यामुळे २१ व्या शतकाच्या गरजा २० व्या शतकाच ओळखणारे आणि शिक्षण क्षेत्रातील दिव्यदृष्टी असलेले रोजगाराभिमुख शिक्षणाचे प्रणेते म्हणून डॉ. डी. वाय. पाटील यांच्याकडे पाहता येणार आहे.  डॉ. डी. वाय. पाटील यांचा भर हा बहुविद्याशाखीय शैक्षणिक संस्थांवर अधिक होता. यामध्ये प्रामुख्याने मेडिसीन, अभियांत्रिकी, दंतवैद्यकशास्त्र, आर्किटेक्चर, नर्सिंग आदी अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक संस्था त्यांनी काढल्या. सध्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये याच संस्थांना प्राधान्य देण्यात आले असून त्यांची निर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे. हा आग्रह आता करण्यात येत असला, तरी तब्बल वीस वर्षांपूर्वी डॉ. डी. वाय. पाटील यांचा तो आग्रह असल्याचे दिसून येते. यातून विद्यार्थ्यांना एकाच छताखाली वेगवेगळ्या विद्याशाखांचे ज्ञान घेता यावे, हाच मुख्य उद्देश त्यामागे त्यांचा होता. डॉ. डी. वाय. पाटील यांनी चार दशके त्यांनी शिक्षण क्षेत्रात घालवली. त्यामध्ये त्यांनी देशात पहिल्यांदाच शिक्षणात आरोग्याचा समावेश केला. यातून त्यांना आरोग्यसेवेतील संशोधनावर महत्त्वाचा भर दिला. त्यांनी शिक्षणाच्या जागतिकीकरणावर मोठ्या प्रमाणात भर दिला. शिक्षणाच्या जागतिकीकरणाची दोन उद्दिष्टे आहेत. एकतर तुम्ही जागतिक दर्जाच्या अभ्यासक्रमाची निर्मिती करायला हवी आणि दुसरे म्हणजे परदेशी विद्यार्थ्यांना तुमच्या विद्यापीठात शिकण्यासाठी आकर्षित करायचे. ही दोन्ही उद्दिष्टे पूर्ण करून शिक्षणाच्या जागतिकीकरणाला प्रोत्साहन देण्याचे कार्य डॉ. डी. वाय. पाटील यांनी केले. त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात परदेशी विद्यार्थी शिक्षण घेताना दिसत आहेत. त्याचबरोबर त्यांच्या विद्यापीठाचे आणि जगातील इतर विद्यापीठांचे मोठ्या प्रमाणात सामंजस्य करार झाल्याचे आपल्याला दिसून येते. त्यांचा भर हा संशोधन आणि नावीन्यतेवर होता. यातूनच त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये जागतिक दर्जाचे संशोधन झाल्याचे दिसून येते.  विद्यार्थ्यांना मेडिसीन, अभियांत्रिकी, दंतवैद्यकशास्त्र, आर्किटेक्चर, नर्सिंग आदी अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याची इच्छा त्या काळात होती; परंतु सरकारी विद्यापीठे किंवा महाविद्यालयांमध्ये त्या काळात मर्यादित जागा असल्यामुळे सरकारला सर्व विद्यार्थ्यांना संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश देणे शक्य नव्हते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याची संधी मिळत नव्हती. अशावेळी त्यांनी खासगी संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची मागणी पूर्ण करण्याचे कार्य केले.

# राज्यात दत्तक प्रक्रिया अधिक गतिमान आणि पारदर्शक होणार

## प्रलंबित प्रकरणे जलद निकाली काढण्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई :** राज्यातील दत्तक प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण व्हावी यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित दत्तक प्रक्रियेच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.




मंत्री तटकरे म्हणाल्या की, राज्यात दत्तक प्रक्रियेत उल्लेखनीय प्रगती झाली असून कायदेशीररित्या दत्तकासाठी मुक्त करण्यात येणाऱ्या बालकांच्या प्रक्रियेत महाराष्ट्र देशात अव्वल आहे. मात्र, काही प्रकरणांमध्ये नातेवाईकांच्या संमतीचा अभाव, वैद्यकीय चाचण्या आणि इतर कायदेशीर बाबींमुळे विलंब होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अशा अडचणी दूर करून प्रक्रिया अधिक जलद आणि परिणामकारक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. मंत्री आदिती तटकरे यांनी राज्यातील प्रलंबित दत्तक प्रकरणांचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देत, प्रत्येक कायदेशीररित्या मुक्त बालकाला सुरक्षित, स्थिर आणि प्रेमळ कुटुंब मिळावे, यासाठी दत्तक प्रक्रिया अधिक वेगवान करण्यावर भर द्यावा, असे सांगितले.

राज्यात सध्या ६२ विशेष दत्तक संस्था कार्यरत आहेत. २०२६-२७ मध्ये शून्य ते १८ वर्षे वयोगटातील १,२८३ बालके दत्तकासाठी कायदेशीर प्रक्रियेत उपलब्ध असून, यावर्षी आतापर्यंत १५७ बालकांना दत्तक देण्यात आले आहे. तसेच नातेवाईकांमार्फत २३९ बालकांची दत्तक प्रक्रिया कायदेशीररित्या पूर्ण करण्यात आली आहे. दत्तक प्रक्रिया केंद्रीय दत्तक ग्रहण संसाधन प्राधिकरण, राज्य दत्तक संसाधन संस्था, विशेष दत्तक संस्था, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा दंडाधिकारी आणि दत्तक इच्छुक पालक यांच्या समन्वयातून दत्तक ग्रहण संसाधन प्राधिकरण (सीएआरए) च्या मार्गदर्शक तत्वांनुसार ऑनलाइन पद्धतीने राबविली जाते.

दत्तक इच्छुक पालकांनी केंद्र शासनाच्या CARINGS https://cara.wcd.gov.in पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून, बालकाच्या सर्वोत्तम हिताचा विचार करून समितीमार्फत पालकांनां बालक दत्तक दिले जाते.

# मंत्रिमंडळ निर्णय

(कृषी व पदुम विभाग)

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेस आणखी तीन वर्षाची मुदतवाढ**
**योजनेत भूमिहीन शेतमजूर व महिला शेतकऱ्यांचा समावेश होणार**
**शेतकरी, शेतमजूरांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांचा योजनेत समावेश**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेस आणखी तीन वर्षांची मुदतवाढ देण्यास तसेच या योजनेत पात्र भूमिहीन शेतमजूर व महिला शेतकऱ्यांचा समावेश करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यापूर्वी ही योजना कुटुंबातील दोनच सदस्यांना लागू होती, आता ही योजना शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना लागू होणार आहे.

शेती करतांना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा धक्का बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, तसेच, अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात, यामुळे मृत्यू ओढवतो किंवा अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस किंवा त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व शेतकरी व खातेदार म्हणून नोंद नसलेल्या, शेतकऱ्याच्या कुटुंबातील १० ते ७५ वर्ष वयोगटातील कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पति/पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) अशा एकूण २ जणांकरिता २०२३-२४ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत होती. यात मृत्यू आणि अपंगत्व आल्यास दोन लाख ते एक लाखांपर्यंतची आर्थिक मदत देण्यात येते.

आता या योजनेस ३१ मार्च २०३१ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. शेतीमध्ये प्रत्यक्ष राबणाऱ्या भूमिहीन शेतमजूरांचा वाटा मोठा असून, कामाच्या ठिकाणी त्यांनाही अपघाताचा धोका असतो. भूमिहीन शेतमजूरांचा अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवते. ही बाब विचारात घेता, या योजनेचे संरक्षण भूमिहीन शेतमजुरांनाही देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत 'महिला शेतकरी' म्हणून प्रमाणपत्र मिळालेल्या महिला शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

योजनेत अपघातामुळे झालेला अंतर्गत रक्तस्त्राव आणि उष्माघात या अपघातांचा नव्याने समावेश करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. योजनेसाठी यापुढे अपीलिय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यांच्या ऐवजी अपर जिल्हाधिकारी राहतील. तसेच या योजनेत आर्थिक मदतीसाठीचा प्रस्ताव स्वीकारण्यासाठी दोन महिन्यांची मुदत राहणार आहे.

आर्थिक मदत थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. त्यासाठी इंटिग्रेटेड ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

००

(ऊर्जा विभाग)

**मुंबईतील शासकीय कार्यालयांसाठी बेस्टची संयुक्त वीज बिलिंग प्रणाली**

मुंबई शहरातील राज्य शासनाच्या तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय कार्यालयांसाठी बेस्ट उपक्रमाची संयुक्त वीज बिलिंग प्रणाली लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच १ एप्रिल २०२६ पासून सर्व शासकीय वीज जोडण्या प्रीपेड पद्धतीमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार, सर्व विभागांना ३० दिवसांच्या आत संयुक्त बिलिंग पोर्टलवर नोंदणी व वीज जोडण्यांच्या माहितीची पडताळणी पूर्ण करावी लागणार आहे. वित्त विभाग आगाऊ निधी वितरणाची कार्यपद्धती निश्चित करणार असून ऊर्जा विभाग तिमाही ताळमेळाची प्रक्रिया राबविणार आहे.

संयुक्त बिलिंग प्रणालीमुळे सर्व वीज जोडण्यांची देयके एकाच व्यासपीठावरून भरता येणार असून, ऑटो-डेबिट सुविधेमुळे बिल भरण्यास होणारा विलंब, त्यावरील व्याज व दंड टाळता येणार आहे. तसेच सर्व जोडण्यांची बिले, वीज वापर, थकबाकी, व्यवहार आणि व्यवस्थापकीय माहिती () एकाच डॅशबोर्डवर उपलब्ध होणार आहे. 'गो ग्रीन' सुविधेमुळे प्रत्येक बिलावर सवलत मिळणार असून, प्रीपेड जोडण्यांवर लागू दरानुसार सवलतीचाही लाभ मिळणार आहे.

सध्या बेस्टच्या प्राधिकृत कोड प्रणालीअंतर्गत ३२२ गटांतील १०,०१७ ग्राहक आणि राज्य शासनाचे १०४ गटांतील ८६९ ग्राहक असून, त्यांना या नव्या प्रणालीचा लाभ मिळणार आहे. आवश्यकतेनुसार नवीन गटही तयार करता येणार आहेत.

या प्रणालीमुळे वीज देयके वेळेत भरली जाऊन विलंब शुल्क व १२ ते १५ टक्के व्याजाचा अतिरिक्त आर्थिक भार टळणार आहे. तसेच बिल तपासणी, निधी उपलब्धता, देयक प्रक्रिया आणि ताळमेळासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची बचत होऊन शासकीय कामकाज अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, विभागीय नोंदणी, ग्राहक पडताळणी, निधी उपलब्धता, तिमाही ताळमेळ आणि प्रणालीचे 'गो-लाईव्ह' अशा चार टप्प्यांत प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. बेस्ट उपक्रमाकडून माहिती-तंत्रज्ञान सुविधा, डॅशबोर्ड, व्यवस्थापकीय माहिती आणि तक्रार निवारणाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(सामान्य प्रशासन विभाग)

**राज्य माहिती आयोगात तीन अतिरिक्त आयुक्त**
**प्रलंबित अपीलाचा जलद निपटारा होणार**

राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित असलेल्या अपिलांचा जलद निपटारा करण्यासाठी बृहन्मुंबई, नाशिक आणि अमरावती खंडपीठांमध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी तीन अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार, प्रत्येक खंडपीठासाठी एक उप सचिव आणि एक कक्ष अधिकारी अशी प्रतिनियुक्तीवरील पदे निर्माण करण्यात येणार आहेत. तसेच एक लघुलेखक, एक लिपिक-टंकलेखक आणि एक शिपाई ही पदे बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने भरली जाणार आहेत. अशाप्रकारे तीनही खंडपीठांसाठी एकूण १८ पदे निर्माण करण्यात येणार आहेत.

प्रलंबित अपिलांची संख्या कमी झाल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त राज्य माहिती आयुक्तांना इतर खंडपीठांमध्ये नियुक्त करण्याचे अथवा काही द्वितीय अपीले त्यांच्या कार्यक्षेत्रात हस्तांतरित करण्याचे अधिकार राज्य मुख्य माहिती आयुक्तांना देण्यात आले आहेत. बाह्य यंत्रणेमार्फत पदे भरताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राज्य माहिती आयोगातील प्रलंबित द्वितीय अपिलांच्या निपटाऱ्याला गती मिळून नागरिकांना माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अपिलांवर अधिक जलद आणि प्रभावी न्याय मिळण्यास मदत होणार आहे.

००

(विधि व न्याय विभाग)

**सिल्लोड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासह सरकारी वकील कार्यालय**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी व सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून या न्यायालयासाठी जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्या एक पदासह न्यायालयासाठी २० नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच वाहनचालक, पुस्तकबांधणीकार, शिपाई, पहारेकरी आणि सफाईगार यांसह पाच पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय, सरकारी वकील कार्यालयासाठी तीन नियमित पदे आणि एक बाह्य यंत्रणेमार्फत पद मंजूर करण्यात आले आहे. अशाप्रकारे न्यायालय व सरकारी वकील कार्यालयासाठी मिळून २३ नियमित आणि ६ बाह्य यंत्रणेमार्फत पदे, अशी एकूण २९ पदांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे सिल्लोड व परिसरातील नागरिकांना जिल्हा व सत्र न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही. स्थानिक पातळीवर न्यायसेवा उपलब्ध झाल्याने न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान, सुलभ आणि परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.

**(विधि व न्याय विभाग)**

**चांदवड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय**

नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी व सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे एक पदासह २१ नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच शिपाई, पहारेकरी आणि सफाईगार या पदांसाठी चार मनुष्यबळांच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे.




या निर्णयामुळे चांदवड व परिसरातील नागरिकांना वरिष्ठ स्तरावरील दिवाणी प्रकरणांसाठी दूरच्या न्यायालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही. स्थानिक पातळीवर न्यायालयाची सुविधा उपलब्ध झाल्याने न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान, सुलभ आणि परिणामकारक होऊन नागरिकांना वेळेत न्याय मिळण्यास मदत होणार आहे.

००

(विधि व न्याय विभाग)

**किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासह सरकारी वकील कार्यालय, दिवाणी न्यायालय**

नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, सरकारी वकील कार्यालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या न्यायिक अधिकारी व सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या पदांमधून या तीनही आस्थापनांसाठी आवश्यक पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासाठी १९ नियमित व ६ बाह्य यंत्रणेमार्फत पदे, सरकारी वकील कार्यालयासाठी ३ नियमित व १ बाह्य यंत्रणेमार्फत पद, तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरासाठी २१ नियमित व ४ बाह्य यंत्रणेमार्फत पदे मंजूर करण्यात आली आहेत.

अशाप्रकारे या तीनही संस्थांसाठी मिळून ४३ नियमित आणि ११ बाह्य यंत्रणेमार्फत पदे, अशी एकूण ५४ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे किनवट व परिसरातील नागरिकांना जिल्हा व सत्र न्यायालय तसेच वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालयाची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही, प्रकरणांच्या निपटाऱ्याला गती मिळेल आणि नागरिकांना अधिक सुलभ, जलद व परिणामकारक न्यायसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या न्यायालयांसाठी आवश्यक न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांची पदे त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

००

(विधि व न्याय विभाग)

**केज येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय**

बीड जिल्ह्यातील केज येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे एक पदासह २१ नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच शिपाई, पहारेकरी आणि सफाईगार या गट 'ड' संवर्गातील चार पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. अशाप्रकारे न्यायालयासाठी एकूण २५ पदांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

या न्यायालयासाठी आवश्यक खर्च न्याय व विधि विभागाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करून देण्यात येणार असून, निधी उपलब्धतेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

या निर्णयामुळे केज व परिसरातील नागरिकांना वरिष्ठ स्तरावरील दिवाणी प्रकरणांसाठी दूरवर जावे लागणार नाही. न्यायसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यास चालना मिळून नागरिकांना अधिक सुलभ, परिणामकारक आणि वेगवान न्यायसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

००

(विधि व न्याय विभाग)

**पिंपरी-चिंचवड येथे विशेष मोटार वाहन न्यायालय**

पिंपरी चिंचवड (जि. पुणे) येथे विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

पिंपरी-चिंचवड येथील प्रलंबित प्रकरणांची संख्या लक्षात घेता विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायाधीश यांनी सादर केला होता. त्यावर उच्च न्यायालयाच्या समितीनेही शिफारस केली. त्यानुसार आज न्यायालय स्थापन करण्यास, आवश्यक पदांना आणि त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात आली.

आवश्यक बारा पदांमध्ये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लघुलेखक श्रेणी-तीन, सहाय्यक अधीक्षक, वरिष्ठ लिपीक अशी प्रत्येकी एक आणि कनिष्ठ लिपीक पाच अशा एकूण दहा नियमित पदांना आणि शिपाई पदांच्या दोन पदांची भरती बाह्ययंत्रणेव्दारे करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी येणाऱ्या एक कोटी २७ लाख एक हजार ५३६ रुपयांच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

मोटार वाहन न्यायालय, जिल्हा न्यायालय, पुणे येथे १ लाख २० हजार १२८ प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी ४७ हजार ८०६ प्रकरणे पिंपरी चिंचवडमधील आहेत. पिंपरी चिंचवड परिसराचा विस्तार वाढत आहे. त्याचबरोबर पिंपरी चिंचवड येथे स्वतंत्र वाहतूक शाखा आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय आहे. मात्र पिंपरी चिंचवड येथील प्रकरणातील नागरिकांना शिवाजी नगर, पुणे येथे जावे लागते. न्यायालयीन कामकाजासाठी शासकीय यंत्रणा आणि नागरिक यांच्यासाठी पिंपरी-चिंचवड येथील विशेष मोटार न्यायालय सोयीचे ठरणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# 'गुंगी गुडिया' पोस्टवरून काँग्रेस विरोधात संताप; पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, इंदिराजींप्रमाणे सुनेत्रा पवार...

दैनिक आपला विदर्भ

**सातारा । प्रतिनिधी :** एखादी महिला राजकारणात सक्रिय काम करत असेल तर तिला प्रोत्साहन दिले पाहिजे. काँग्रेसने नेहमीच राजकारणाची पातळी सांभाळली आहे. सुनेत्रा पवार या सक्रिय राजकारणात असून एका घटनात्मक पदाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्याबद्दल बोलताना पातळी सोडून बोलणे योग्य नाही. इंदिराजींप्रमाणे सुनेत्रा पवार कृतीतून उत्तर देतील, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडलवरील 'गुंगी गुडिया' पोस्टवरून राजकीय वातावरण तापले. बारामतीमध्ये राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी



माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या पोस्टरला 'जोडे मारो' आंदोलन केले. त्यानंतर पृथ्वीराज चव्हाण यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या बारा वर्षात पत्रकारांना कधीही सामोरे गेलेले नाहीत. '५० करोड की गर्लफ्रेंड, काँग्रेस की विधवा' किंवा गुजरातच्या महिलांच्याबद्दलची त्यांची वक्तव्ये जगजाहीर आहेत. पण, काँग्रेसची वेगळी परंपरा आहे. काँग्रेसने राजकारणाची पातळी सोडलेली नाही. राम मनोहर लोहियांनी इंदिराजींबद्दल जो शब्द प्रयोग केला होता. त्याला इंदिराजींनी कृतीतून उत्तर दिले होते. सुनेत्रा पवार या देखील सक्रिय राजकारणात कार्यरत असून एका घटनात्मक पदाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्याबद्दल पातळी सोडून बोलणे योग्य नाही. त्या देखील कृतीने उत्तर देतील, अशी अपेक्षा पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

बीडमधील कायदा, सुव्यवस्थेच्या अनुषंगाने विचारण्यात आलेल्या प्रश्नाला काहीही उत्तर न देता पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी पत्रकार परिषद गुंडाळली. त्या संदर्भात काँग्रेसच्या सोशल मीडियावर पोस्ट करत 'गुंगी गुडिया' अशी टिप्पणी करण्यात आली होती. अर्थातच महिलांच्या बाबतीमध्ये असे उद्गार टाळता आले असते. प्रश्न विचारायचा पत्रकारांचा अधिकार आहे आणि उत्तर न देण्याचा मंत्र्यांचा. पण, त्यामुळे बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अनुत्तरीत राहते. त्याला सर्वस्वी गृहमंत्री जबाबदार असल्याने त्यांनीच उत्तर दिले पाहिजे, अशी उपरोधिक मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.

दरम्यान, सुनेत्रा पवारांशी संबंधित पोस्टशी माझा कोणताही संबंध नसताना माझ्या विरोधात आरोप आणि आंदोलन करण्यात येत आहे. कोणावरही आरोप करण्यापूर्वी कार्यकर्त्यांनी वस्तुस्थितीची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक आहे, अशा शब्दांत पृथ्वीराज चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना सल्ला दिला आहे.

## महत्त्वाचे...

### शिंदेंच्या बालेकिल्ल्यात कोयता पॅटर्न! ठाण्यातील कॅनन हॉटेलवर हल्ला; मॅनेजरला मारुन टाकण्याची धमकी

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे । प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या ठाणे शहरात गुन्हेगारांचे मनोबल पुन्हा एकदा वाढल्याचे चित्र समोर आले आहे. ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकालगत असलेल्या प्रसिद्ध 'हॉटेल कॅनन'मध्ये एका माथेफिरूने कोयत्याचा धाक दाखवत तुफान तोडफोड केली आणि दोन हजार रुपयांच्या हप्त्यासाठी थेट मॅनेजरला जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरातील व्यावसायिक आणि नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या प्रसिद्ध हॉटेल कॅननमध्ये ही घटना घडली. आरोपीने हातात कोयता घेऊन हॉटेलमध्ये थेट प्रवेश केला. हॉटेलमध्ये शिरताच त्याने तेथील काचा, फर्निचर आणि इतर साहित्याची तोडफोड करण्यास सुरुवात केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे हॉटेलमधील ग्राहक आणि कर्मचाऱ्यांची पळापळ झाली. तोडफोड केल्यानंतर आरोपीने थेट हॉटेल मॅनेजरला गाठले आणि दोन हजार रुपये दे, नाहीतर तुला मारून टाकतो अशी थेट जीवे मारण्याची धमकी दिली. केवळ पैशांच्या वसुलीसाठी आणि स्वत:ची दहशत निर्माण करण्यासाठी आरोपीने हे कृत्य केल्याचे उघड झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान या आरोपीचे नाव देशमुख असल्याचे निष्पन्न झाले आहे.

रेल्वे स्थानकासारख्या वर्दळीच्या आणि गजबजलेल्या ठिकाणी दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून फरार आरोपी देशमुखचा शोध सुरू केला आहे.

### डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केला शोक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे.

शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात डॉ. डी. वाय. पाटील यांनी उभारलेले कार्य सदैव स्मरणात राहील. आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून त्यांनी अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांची उभारणी करून असंख्य विद्यार्थ्यांना ज्ञान, शिक्षण व प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली, असे त्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी असून, त्यांच्या कार्याचा ठसा महाराष्ट्रासह देशाच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रावर कायम राहील. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक महान शिक्षणमहर्षी, दूरदृष्टीचे समाजसेवक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व गमावले आहे. त्यांची समाजाप्रती असलेली निष्ठा, कार्यतत्परता आणि लोककल्याणाची भावना भावी पिढ्यांना सदैव मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, असेही राज्यमंत्री मिसाळ यांनी म्हटले आहे.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना, राज्यमंत्री मिसाळ यांनी त्यांच्या कुटुंबीयांच्या व आप्तेष्टांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त केली आहे. परमेश्र्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच ईश्र्वरचरणी प्रार्थना असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल मंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला शोक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या जाण्याने शिक्षण, समाजसेवा आणि सहकार क्षेत्रातील एक दूरदर्शी नेतृत्व हरपल्याची भावना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली.

मंत्री आबिटकर म्हणाले, डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा दिली. ग्रामीण भागापासून ते जागतिक स्तरापर्यंत दर्जेदार शिक्षण संस्था उभारून त्यांनी महाराष्ट्राचे नाव उंचावले. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी, सहकार आणि सेवाभाव यांचा आदर्श त्यांनी आयुष्यभर जपला. त्यांच्या कार्याची दखल देश-विदेशात घेण्यात आली. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान भावी पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. त्यांच्या निधनाने समाजाचा मोठा आधारवड हरपला आहे, असेही आबिटकर यांनी नमूद केले.

दिवंगत पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना मंत्री आबिटकर यांनी दिवंगत आत्म्यास चिरशांती लाभो तसेच त्यांच्या कुटुंबीयांना, आप्तेष्टांना आणि असंख्य विद्यार्थ्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती लाभो अशी प्रार्थना केली.

## आदित्य ठाकरेंनी दुसऱ्यांवर टीका करण्यापेक्षा स्वत:चा मतदारसंघ सांभाळावा! : मंत्री राणे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** बिहारमधील पोटनिवडणुकीतील पराभवावरून भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधणाऱ्या उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी जोरदार पलटवार केला आहे. आदित्य ठाकरेंनी भाजपवर बोलण्यापेक्षा आधी स्वत:चा वरळी मतदारसंघ सांभाळावा, २०२९ ची निवडणूक त्यांना अत्यंत कठीण जाणार आहे, असा टोला राणे यांनी लगावला.

एका पोटनिवडणुकीतील पराभवाने विरोधकांना खूप आनंद झाला असला तरी जनमताचा नेहमीच आदर केला पाहिजे, असे सांगत नितेश राणे म्हणाले की, नुकतीच मुंबईत झालेली 'बेस्ट' पतपेढीची निवडणूक ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन लढवली होती. मात्र, या निवडणुकीत त्यांचा दारुण पराभव झाला. दोन्ही ठाकरे एकत्र लढूनही तोंडावर



आपटले, मग आता मराठी माणसाने यांना लाथ मारून हकलवून लावले असे आम्ही म्हणायचे का, असा सवाल त्यांनी केला. पश्चिम बंगालमध्येही भाजपचे सरकार आले असून आमचा मुख्यमंत्री तेथे बसला आहे, याची आठवणही त्यांनी या वेळी करून दिली.

राज्यात नव्याने लागू झालेल्या 'महाराष्ट्र धर्म स्वातंर्त्य कायद्याचे' स्वागत करताना नितेश राणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेचे कौतुक केले. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात दिलेले आश्वासन पूर्ण करत हा कायदा अधिवेशनात संमत करण्यात आला असून राष्ट्रपतींचीही त्याला मंजुरी मिळाली आहे. या कायद्यामुळे राज्यातील हिंदू माता-भगिनींकडे नावाने वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर ७ ऑगस्टपासून राज्यव्यापी दौरा सुरू करत असलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत बोलताना राणे यांनी सरकारची भूमिका सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले. मनोज जरांगे आणि सरकारमध्ये उत्तम संवाद असून, बैठकीच्या माध्यमातून सर्व प्रश्नांवर नक्कीच मार्ग काढला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळातच मराठा समाजाच्या प्रमुख मागण्या मान्य झाल्या होत्या आणि पुढेही सकारात्मक चर्चा करून योग्य निर्णय घेतले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## ज्युनियर कलाकारांच्या न्याय्य मागण्यांवर शासन सकारात्मक – मंत्री आकाश फुंडकर यांची ग्वाही



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील ज्युनियर कलाकारांच्या वेतनवाढ, सेवा अटी तसेच कामगार हक्कांबाबत शासन संवेदनशील असून त्यांच्या सर्व न्याय्य मागण्यांवर नियमानुसार आणि कायदेशीर चौकटीत योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली.

ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशनच्या प्रतिनिधींनी मंत्री फुंडकर यांची भेट घेऊन विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी त्यांनी प्रतिनिधींच्या मागण्या सविस्तरपणे ऐकून घेत संबंधित विषयाची गांभीर्याने दखल घेतली.

यावेळी मंत्री फुंडकर म्हणाले, मनोरंजन क्षेत्रातील कनिष्ठ कलाकार हे या उद्योगाचा महत्त्वाचा घटक असून त्यांच्या श्रमांचा योग्य सन्मान होणे आवश्यक आहे. कामगारांचे हित, सुरक्षितता आणि न्याय्य वेतन ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असून संबंधित सर्व बाबींची सखोल पडताळणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. कामगारांचे हक्क अबाधित राहतील, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

कामगार विभागाच्या माध्यमातून संबंधित यंत्रणा, ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशन आणि निर्माते संघटना यांच्यात समन्वय साधून सर्वमान्य व शाश्र्वत तोडगा काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. कामगारांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करून कायदेशीर तरतुदींनुसार निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील प्रत्येक कामगाराला सन्मानाने आणि सुरक्षित वातावरणात काम करण्याची संधी मिळावी, ही शासनाची भूमिका असून कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असेही मंत्री फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

## राज्यात ९० टक्के पेरणी पूर्ण! कोकणात सर्वाधिक १०९ टक्के पाऊस

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात यंदा पावसाची स्थिती समाधानकारक असून, अनेक भागात पेरणीच्या कामाला वेग आला आहे. राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांनी मंगळवारी (दि.४) मंत्रालयामध्ये राज्यातील पाऊस, पेरणी, खतसाठा आणि शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत पत्रकारांना माहिती दिली. तसंच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याबाबत महाराष्ट्र काँग्रेसच्या 'एक्स' (ट्विटर) हँडलवर करण्यात आलेल्या आक्षेपार्ह ट्वीट प्रकरणावरही राष्ट्रवादी काँग्रेसकडून देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाचा त्यांनी उल्लेख केला.

## कॅब चालकाचे प्रवासी तरुणीवर जडले प्रेम, ७ महिने चालले अफेअर, मग अनैतिक संबंधात आला ट्विस्ट, नदीत तरंगताना दिसला मृतदेह

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** प्रेमाच्या त्रिकोणातून एका महिलेची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही हत्या दुसरी तिसरी कुणी नव्हे तर महिलेच्या पतीनेच आपल्या प्रेयसीच्या मदतीने केल्याचे समोर आले आहे. पत्नी घरातून दागिने घेऊन पळून गेल्याचा बनाव ओला कॅब चालक असलेल्या पतीने केला होता. तशी पोलीस ठाण्यात तक्रारही दिली होती. मात्र त्याचा बनाव फार काळ टिकला नाही. पोलिसांनी प्रेमाच्या त्रिकोणातून झालेल्या हत्याकांडाचा पर्दाफाश केला असून कॅब चालकासह त्याच्या प्रेयसीला अटक केली आहे.

ही घटना उत्तर प्रदेशच्या लखनऊमधील रहीमाबाद येथील आहे. ओला कॅब ड्रायवर उमेंद्र प्रताप सिंग (३१ वर्ष) त्याची पत्नी अंजली सिंह सोबत वास्तव्यास होता. दोघांचाही अगदी सुखाचा संसार सुरू होता. मात्र, एक दिवस ३१ वर्षीय उमेंद्रच्या कॅबमध्ये कॉल सेंटर मध्ये काम करणाऱ्या आरती वर्माची एन्ट्री झाली. त्या ट्रीपमध्ये ड्रायवर उमेंद्र आणि आरती यांच्यात चांगल्याच गप्पा रंगल्या. उमेंद्र आधीच विवाहित असूनही दोघांच्या या भेटींच रूपांतर प्रेमामध्ये झाले. दोघंही ७ महिन्यांपासून संबंधात होते.

दोघांच्या या संबंधांबद्दल उमेंद्रची पत्नी अंजली हिला कोणतीही माहिती नव्हती. महिनाभरापूर्वी अंजलीला या आपल्या पतीच्या अनैतिक संबंधांची माहिती मिळाली आणि यामुळे घरात रोज वाद सुरू झाले. अंजलीचा विरोध आपल्या अनैतिक संबंधामध्ये अडसर वाटू लागल्याने उमेंद्र आणि आरतीने तिला संपवण्याचा कट रचला. ३० जुलैच्या मध्यरात्री दोघांनी अंजलीचा गळा आवळून हत्या केली. हत्या लपवण्यासाठी त्यांनी मृतदेह चादरीत गुंडाळून स्विफ्ट डिझायर कारने इटौंजा येथे नेऊन नदीत फेकून दिला. उमेंद्रवर २०२० मध्ये देखील मारहाणीचा गुन्हाही दाखल होता. आपला हत्येचा कट पोलिसांपर्यंत पोहोचू नये म्हणून उमेंद्रने संगळ्यांचीच दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. उमेंद्रने घरातील ८ ते १० लाख रुपयांचे दागिने आरतीकडे दिले. त्यांनंतर पत्नी दागिने चोरून पळून गेल्याची खोटी तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवली. मात्र, पुढे नदीत आढळलेल्या मृतदेहाची अंजलीच्या भावाने ओळख पटवून उमेंद्रवर संशय व्यक्त केला.

रहीमाबाद पोलिसांनी मोबाईल लोकेशन आणि कॉल डिटेल्स तपासले. त्यांना मिळलेलले पुरावे आणि उमेंद्रच्या दाव्यात तफावत आढळली. १ ऑगस्ट रोजी पोलिसांनी उमेंद्रला त्याला ताब्यात घेतले. त्याने आपल्या पत्नीची हत्या आरतीसोबत मिळून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी उमेंद्र सोबत आरतीलाही अटक करून १० लाखांचे दागिने, स्विफ्ट कार आणि २ मोबाईल जप्त केले. सध्या दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

### अभिनेत्री मृणाल ठाकूर करणार AI-निर्मित डीपफेक मजकुराबाबत कडक कायदेशीर कारवाई...

हैदराबाद : अभिनेत्री मृणाल ठाकूरनं तिच्या ओळखीचा गैरवापर करण्याबाबत आणि AI-निर्मित डीपफेक मजकुरावर कडक कायदेशीर कारवाईबाबतची एक पोस्ट शेअर केली आहे. तिनं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं, 'माझ्या दिसण्यासारखे रूप वापरून डीपफेक मजकूर तयार करणे किंवा तो शेअर करणे बेकायदेशीर आणि अस्वीकार्य आहे. हा इशारा गांभीर्यानं घ्या आणि हे प्रकार त्वरित थांबवा. माझ्या ओळखीचा यापुढं कोणताही गैरवापर झाल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मंगळवारी, अभिनेत्रीनं कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याबाबत वाढत्या चिंतेवर भाष्य केल्यानंतर तिची पोस्ट सोशल मीडियावर चर्चेत आली. आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केलेल्या एका ठाम निवेदनात, मृणालनं स्पष्ट केलं की ती AI-निर्मित मजकुराद्वारे आपल्या प्रतिमेचा अनधिकृत वापर खपवून घेणार नाही. डीपफेक गैरवापरांमुळं सेलिब्रिटींना चांगलाचं फटका बसतो. दरम्यान अनेक स्टार्सनं आपली प्रतिमा, आवाज आणि व्यक्तिमत्त्वाचे अधिकार सुरक्षित करण्यासाठी कायदेशीर मार्गांचा अवलंब केला आहे. AI-आधारित ओळखीच्या गैरवापरांविरुद्ध आवाज उठवणाऱ्या अनेक भारतीय कलाकारांपैकी मृणाल पण एक आहे.

## एअर इंडियाच्या फुकेट-दिल्ली फ्लाईटला भीषण टर्ब्युलन्स, 134 प्रवाशांचा जीव टांगणीला

दैनिक आपला विदर्भ

नवी दिल्ली : एअर इंडियाच्या फुकेट-दिल्ली फ्लाईटसह धक्कादायक घटना घडली आहे. फुकेटवरुन दिल्लीच्या दिशेने निघालेल्या विमान टर्ब्युलन्सचं शिकार झालं आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण पाहायला मिळालं. अचानक झालेल्या या प्रकारामुळे प्रवाशी आणि कर्मचारी भयभीत झाले. प्रवाशांनी आरडाओरडा केला. फ्लाईटमध्ये एकूण १३४ प्रवाशी आणि कर्मचारी होते. टर्ब्युलन्समुळे त्यापैकी काही प्रवाशी आणि क्रू-मेंबर जखमी झाले. मात्र सर्व प्रवाशी सुखरुप आहेत.

मंगळवारी फुकेटहून एअर इंडियाच विमान (२३७९) दिल्लीच्या दिशेने निघालं होतं. मात्र या दरम्यान विमान टर्ब्युलन्सचं शिकार झालं. वेगवान वाऱ्याचा फटका विमानाला बसला. त्यामुळे विमान जोरात हललं. ध्यानीमनी काहीही नसताना अचानक झालेल्या या प्रकारामुळे प्रवाशी घाबरले. त्यामुळे प्रवाशांनी आरडाओरडा सुरु केला. या टर्ब्युलन्समुळे काही प्रवाशांसह कर्मचाऱ्यांना दुखापत झालीय.

मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडियाचं विमान हे सकाळी ११ वाजता नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सकाळी सुरक्षितरित्या उतरलं. त्यानंतर टर्ब्युलन्समुळे जखमी झालेल्यांना तातडीने वैद्यकीय मदत पुरवण्यात आली. सूत्रांनुसार, खबरदारी म्हणून जवळपास १० प्रवाशी आणि क्रू मेंबरमधील दोघांना खबरदारी म्हणून तपासणी करण्यासाठी मेदांता मेडीकल सेंटरमध्ये नेण्यात आलं. एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानाला काही वेळ टर्ब्युलन्सचा सामना करावा लागला. त्यामुळे काही क्षण विमानाची उंची खालावली. विमान दिल्लीत सुरक्षितपणे उतरलंय. सर्व प्रवाशी आणि कर्मचारी विमानातून सुखरुप बाहेर आले. प्रवाशी आणि कर्मचाऱ्यांपैकी कुणालाही गंभीर दुखापत झालेली नाही, अशी माहिती एअर इंडियाकडून देण्यात आली आहे.

या सर्व प्रकाराचा साक्षीदार असलेल्या एका प्रवाशाने याबाबत एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे. मी माझ्या भावासोबत याच विमानात




होतो. अनेक जण खूप जखमी झाले होते. त्यांना स्ट्रेचर आणि व्हीलचेअरच्या मदतीनं बाहेर काढण्यात आलं. विमान सुरक्षितपणे उतरलं याचा मला खूप आनंद आहे. विमान उतरू शकेल की नाही, याबद्दल आम्हाला खूप काळजी वाटत होती. या घटनेची निश्चितपणे सखोल चौकशी व्हायला हवी, असं प्रिन्स चड्ढा या प्रवाशाने त्याच्या एक्स पोस्टमध्ये म्हटलंय.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'सक्षम कौशल्य जनगणना' कॉफी टेबल बुकचे प्रकाशन

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या 'सक्षम कौशल्य जनगणना' या अभिनव उपक्रमाच्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुंबई उपनगरचे पालकमंत्री ड. आशिष शेलार, सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री मंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुंबई उपनगर चे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यावेळी उपस्थित होते.

'सक्षम कौशल्य जनगणना' हा मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेला देशातील पहिला एआय-सक्षम हायपरलोकल कौशल्य जनगणना उपक्रम आहे. रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधींसाठी सविस्तर कौशल्य डेटा तयार करण्याचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ५९,८२४ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले असून ४४,९८२ उमेदवारांची नोंद, १,०१८ नियोक्ते आणि ५२ प्रशिक्षण संस्थांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे. या सर्वेक्षणातून बेरोजगार, कौशल्यवृद्धी इच्छुक, स्वयंरोजगारासाठी इच्छुक; तसेच गृहिणींसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण माहिती संकलित करण्यात आली आहे.

**'सक्षम कौशल्य जनगणना'मुळे उपजीविका आणि रोजगारनिर्मितीला नवी दिशा**

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या 'सक्षम कौशल्य जनगणना' या अभिनव उपक्रमामुळे रोजगार, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार क्षेत्रात महत्त्वपूर्ण परिणाम दिसून येत आहेत. या जनगणनेतून रोजगारक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यातील तफावत स्पष्ट झाली असून, भविष्यातील नियोजनासाठी भक्कम पाया तयार झाला आहे.

जनगणनेदरम्यान सर्वेक्षण करण्यात आलेल्या जवळपास ९८ टक्के नागरिकांकडे औपचारिक कौशल्य प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले. रोजगारक्षमता आणि कार्यबलाच्या औपचारिकीकरणातील ही मोठी दरी भरून काढण्यासाठी 'सक्षम' उपक्रम प्रभावी ठरत आहे. सर्वेक्षणानंतर ३२ हजारांहून अधिक उमेदवारांना वैयक्तिकृत करिअर मार्गदर्शन देण्यात येणार आहे. बाजारपेठेच्या गरजांनुसार २२ हजारांहून अधिक उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षणाशी जोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय ५ हजार ८०० हून अधिक बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधींशी जोडण्याची प्रक्रिया सुरू असून, १ हजार ६९० हून अधिक उमेदवारांशी नियोक्त्यांनी मुलाखती व भरतीसाठी थेट संपर्क साधला आहे.

स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ४ हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना संरचित प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि व्यवसाय सल्ला दिला जाणार आहे; तसेच ६ हजारांहून अधिक गृहिणी, दिव्यांग व्यक्ती आणि समाजातील वंचित घटकांना औपचारिक उपजीविका, कौशल्य प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे. सीएसआर-समर्थित प्रशिक्षण भागीदारी, सातत्यपूर्ण नियोक्ता सहभाग, नियमित रोजगार मेळावे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित धोरणात्मक विश्र्लेषणामुळे रोजगारनिर्मितीची प्रक्रिया अधिक गतिमान आणि लक्ष्याधारित झाली आहे. विशेष म्हणजे, मुंबई उपनगरचे वार्षिक कौशल्य व रोजगार उद्दिष्ट ८०० ते १,००० उमेदवारांचे असताना, 'सक्षम'च्या एका पथदर्शी वॉर्ड प्रकल्पातूनच सुमारे २२ हजार उमेदवारांसाठी उपजीविका तयार करण्यात आली आहे.

या उपक्रमाच्या पुढील टप्प्यात वॉर्डस्तरीय साप्ताहिक रोजगार मेळावे, नियोक्त्यांच्या सहभागातून क्षेत्रनिहाय अल्पकालीन व दीर्घकालीन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, तसेच स्वयंरोजगार इच्छुकांना पीएमईजीपी, मुद्रा, यांसारख्या योजनांशी जोडण्यावर भर दिला जाणार आहे. व्यवसाय नियोजनासाठी मेंटर गटांची स्थापना, उद्योजकता इनक्युबेशन केंद्रांशी भागीदारी, सातत्यपूर्ण कौशल्य डेटाबेस अद्ययावत ठेवणे, प्रत्येक उमेदवाराला करिअर मार्गदर्शन देणे आणि विविध शासकीय अप्रेंटिसशिप व रोजगार योजनांशी उमेदवारांना जोडण्याची कार्यवाही ही हाती घेण्यात येणार आहे. या सर्व कार्यवाहीची माहिती कॉफी टेबल बुक मध्ये आहे.

## वृत्तविशेष...

### भरधाव कंटेनरची चार वाहनांना धडक; एकाचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी





दैनिक आपला विदर्भ

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे शहराजवळील चाळीसगाव चौफुली परिसरात मंगळवारी भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने नियंत्रण सुटल्याने चार वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात एका पे रिक्षाचालकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, उड्डाण पुलावरून येणाऱ्या कंटेनरला थांबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, चालकाने वाहन पुढे नेत असताना त्यावरील नियंत्रण सुटले आणि कंटेनरने समोरील चार वाहनांना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, पे रिक्षाचालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर अन्य दोन जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या अपघाताचे नेमके कारण काय, याचा तपास पोलिसांकडून सुरू असून पुढील कारवाई करण्यात येत आहे.

### मुंबई वेधशाळेचा पाच दिवसांचा हवामान अंदाज; राज्यातील विविध जिल्ह्यांना अलर्ट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई वेधशाळेने पुढील पाच दिवसांसाठी राज्यातील हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि पावसाची शक्यता लक्षात घेऊन ऑरेंज व यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी हवामानाच्या स्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

५ ऑगस्ट रोजी रायगड जिल्हा व पुणे जिल्ह्यातील घाट परिसरास ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच नाशिक घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दि. ६ ऑगस्ट रोजी नाशिक घाट, सातारा घाट, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून यलो अलर्ट देण्यात आला आहे.

७ ऑगस्ट रोजी हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

८ ऑगस्ट रोजी सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना व विजांच्या कडकडाटाची शक्यता असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे.

नागरिकांनी स्थानिक प्रशासन आणि हवामान विभागाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांचे पालन करावे. मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसाच्या शक्यतेमुळे आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कळविण्यात आले आहे.

### पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांना शोक


**मुंबई । प्रतिनिधी :** पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या निधनाने शिक्षण, सामाजिक कार्य आणि सहकार क्षेत्रातील एक दूरदर्शी नेतृत्व हरपले आहे, अशा शब्दात वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी शोक व्यक्त केला.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षणाचा दीप ग्रामीण भागापर्यंत पोहोचवत लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात त्यांनी उभारलेल्या संस्था दर्जेदार शिक्षण, संशोधन आणि आरोग्यसेवेचे उत्कृष्ट केंद्र बनल्या. महाराष्ट्रासह देशाच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांचे कार्य, दूरदृष्टी आणि समाजसेवेचा वारसा भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे.

ईश्र्वर त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, आप्तेष्टांना तसेच असंख्य विद्यार्थ्यांना व अनुयायांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो या शब्दात मंत्री मुश्रीफ यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## शिक्षण, समाजसेवेसह राष्ट्रनिर्मितीला वाहिलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हरपले

### ज्येष्ठ नेते डॉ. डी. वाय. पाटील यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून श्रद्धांजली



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी राज्यपाल, डी. वाय. पाटील समूहाचे संस्थापक पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंतराव तथा डी. वाय. पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या जाण्याने शिक्षण, समाजसेवा आणि सार्वजनिक जीवनाला दिशा देणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हरपल्याची शोकभावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानून आयुष्यभर कार्य केले. देशभरात शेकडो शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि अन्य उच्च शिक्षण संस्था उभारून त्यांनी लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याला नवी दिशा दिली. शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि समाजसेवा या क्षेत्रांतील त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि चिरस्मरणीय आहे.

त्रिपुरा, बिहार तसेच पश्र्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून त्यांनी घटनात्मक मूल्ये जपत जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. सार्वजनिक जीवनात त्यांनी साधेपणा, दूरदृष्टी आणि समाजहिताची भूमिका कायम जपली. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने देशाने एक दूरदर्शी शिक्षणमहर्षी, समाजसेवक आणि अनुभवी सार्वजनिक नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. ईश्र्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, ही प्रार्थना करते, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

## ई-२० इंधनाविरोधात दिल्लीत अरविंद केजरीवाल यांचा एल्गार

### पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानाकडे आपचा मोर्चा; अमेरिकेच्या दबावाखाली देशावर निर्णय थोपवल्याचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :**ई-२० इंधनाच्या विरोधाची धग आता संपूर्ण देशभरात पसरली असताना याच मुद्द्यावरून आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे देखील मैदानात उतरले आहे. ई-२० इंधनाच्या विरोधात अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वात पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे मोर्चा काढला आहे. मात्र, पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकारली होती. असे असताना हा मोर्चा निघाला होता. परिणामी फिरोजशाह रोडवर पोलिसांनी हा मोर्चा अडवला आहे. यानंतर पत्रकारांशी बोलताना, केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यापुढे झुकल्याचा आरोप केला. अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली देशावर ई-२० चा निर्णय थोपवला जातोय असेही केजरीवाल म्हणाले.

केंद्र सरकारवर निशाणा साधताना केजरीवाल यांनी आरोप केला की, पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली इथेनॉल-मिश्रित इंधनाला प्रोत्साहन देत आहेत. अरविंद केजरीवाल यांनी आरोप केला की, पंतप्रधान ट्रम्प यांच्यापुढे झुकत आहेत आणि या धोरणाचा फायदा भारतीय शेतकऱ्यांऐवजी अमेरिकन शेतकऱ्यांना होईल. त्यांनी सांगितले की, २.३३ लाख लोकांनी इथेनॉल धोरणाला विरोध केला आहे.

पुढे बोलताना अरविंद केजरीवाल असेही म्हणाले की, देशभरात इथेनॉल लागू करणे हा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी किंवा हरदीप सिंग पुरी यांच्या स्तरावरील निर्णय नाही, तर तो पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय आहे. त्यांनी आरोप केला की, हा निर्णय केवळ ट्रम्प यांच्या दबावाखाली घेतला जात आहे आणि सरकारने बाह्य दबावाला बळी न पडता लोकांना शुद्ध पेट्रोल द्यावे, असे आवाहन केले.

आप नेते अनुराग धांडा म्हणाले की, लोक खूप नाराज आहेत. ते अडचणीत आहेत. ३० कोटी वाहने नादुरुस्त होण्याच्या मार्गावर आहेत आणि पंतप्रधान कोणाचेही ऐकत नाहीत. केवळ अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या दबावाखाली इथेनॉल लादले जात आहे. तिथले शिल्लक इथेनॉल भारतात वापरले जात आहे, त्यामुळे मला वाटते की हे योग्य नाही. लोकांचे म्हणणे ऐकले पाहिजे. पंतप्रधान का भेटत नाहीत? पंतप्रधान म्हणत होते की ते तरुणांनाही भेटणार नाहीत. मग त्यांना भेटायलाच हवे होते.



आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल म्हणाले, मला हे सांगायचे आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या दबावाला बळी पडू नये. त्यांनी अमेरिकेकडून इथेनॉल खरेदी करणे आणि आपल्या देशावर ई-२० लादणे थांबवावे. मला आशा आहे की पंतप्रधान आम्हाला बोलावतील. आम्ही पंतप्रधानांना संदेश पाठवला आहे की आम्हाला त्यांना भेटायचे आहे. पण आमचा संघर्ष सुरूच राहील.

# महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी 'शक्ती ऑन व्हील्स' उपक्रम महत्त्वपूर्ण - मंत्री आदिती तटकरे

## सचिवालय जिमखाना येथे 'शक्ती ऑन व्हील्स' प्रदर्शनी व विक्री व्हॅनचे उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** शहरातील महिला बचत गटांनी तयार केलेले खाद्यपदार्थ आणि दैनंदिन वापराच्या वस्तू शासकीय कार्यालये व वसतीगृहांमध्ये सहज उपलब्ध झाल्यास नोकरदार महिलांना मोठा दिलासा मिळेल, असे सांगून राज्यात अशा स्वरूपाचे 'शक्ती ऑन व्हील्स' उपक्रम अधिक व्यापक प्रमाणात राबविण्यात यावेत, अशी अपेक्षा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केली.

सचिवालय जिमखाना येथे 'शक्ती ऑन व्हील्स' या प्रदर्शनी व विक्री व्हॅनचे उद्घाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. अनिर्वेदशक्ती फाउंडेशनच्या माध्यमातून महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांच्या विक्रीसाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. फाउंडेशनच्या संस्थापक आर. विमला यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकार झाला आहे.

यावेळी मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, जिल्ह्यातील विविध बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि त्यांची थेट ग्राहकांपर्यंत पोहोच वाढावी, या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. विविध शासकीय कार्यालये तसेच मेट्रो स्थानक परिसरात अशा विक्री व्हॅन कार्यरत झाल्यास महिला उद्योजकांच्या व्यवसायाला चालना मिळेल. रेडी-टू-ईट पदार्थ, मिलेट उत्पादने, घरगुती वस्तू आणि दैनंदिन वापरातील साहित्य नोकरदार महिलांना त्यांच्या कार्यस्थळी सहज उपलब्ध झाल्यास त्यांचा वेळ वाचेल आणि दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल.

फाउंडेशनच्या संस्थापक व निवृत्त सनदी अधिकारी आर. विमला यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरणासाठी अनेक संस्था काम करीत असतात. महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही समस्या असल्याचे निदर्शनात आले. यावर उपाय म्हणून ग्राहकांना त्यांच्या सोयीप्रमाणे उत्पादने उपलब्ध करून दिल्यास त्याची मागणी वाढू शकते, यामुळे महिला बचत गटांच्या महिलांचा उद्योग वाढण्यासही मदत होईल.

'शक्ती ऑन व्हील्स'वर पापड, लोणची, तूप, विविध प्रकारची पिठे, रेडी-टू-ईट पदार्थ आदी दैनंदिन वापरातील सर्व उत्पादने सेंद्रिय पद्धतीने तयार करण्यात आली असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या रासायनिक घटकांचा वापर केलेला नाही. स्वयंसहायता बचत गटांनी तयार केलेली ही दर्जेदार उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही या उपक्रमातून मोठी चालना मिळणार आहे.




मुंबई शहरातून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली असून, पुढील काळात राज्यभर तसेच देशभरात किमान १०० विक्री वाहने सुरू करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले. फिरत्या विक्री व्हॅनमुळे ग्राहकांना आवश्यक वस्तू त्यांच्या परिसरात उपलब्ध होतील. त्यामुळे उत्पादक महिला, विक्री करणाऱ्या महिला आणि ग्राहक अशा तिन्ही घटकांना या उपक्रमाचा लाभ होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.